● मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अहो आश्चर्यम्, नारायण कुचेंच्या प्रचाराचा खर्च दिवसाला अवघा ६,४९६ रुपये

## निवडणूक विभागाला सादर केला खर्चाचा तपशिल, या खर्चाची निवडणूक विभाग पडताळणी करणार का?

**जालना । प्रतिनिधी -** यंदाच्या विधानसभा निवडणुकीत निवडणुक आयोगाने उमेदवारांना ४० लाख रुपये खर्चाची मर्यादा ठरवून दिल्याने विविध राजकीय पक्षांचे तसेच अपक्ष उमेदवार आपला खर्च कमीत कमी दाखविण्यावर भर देत असल्याचे दिसून येत आहे. बदनापूर मतदार संघातील भाजपाचे उमेदवार आ. नारायण कुचे यांनी २४ ऑक्टोबर २४ ते ६ नोव्हेंबर २४ अशा तब्बल १४ दिवसांचा खर्च ९०,९३९ रुपये इतका दाखविला आहे. याचाच अर्थ आमदार कुचे यांनी दिवसाला अवघे ६,४९६ रुपये खर्च केल्याचे निवडणुक विभागाच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे. अर्थात निवडणुक विभाग या खर्चाची अजून दोन वेळा कसून तपासणी करणार



आहे. त्यामुळे उमेदवारांना झालेला खर्च दाखवितांना दमछाक उडणार आहे. कारण दाखवलेला खर्च आणि वास्तविकतेचा खर्च यात तफावत आढळून आल्यास कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचा ईशारा यापुर्वीच निवडणुक विभागाने दिला आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघातील खर्च तपासणीसाठी खर्च निवडणूक निरीक्षक म्हणून देवप्रकाश बमनावत (आयआरएस) यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोगाने केलेली आहे. उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ रोजी जालना येथील तहसील कार्यालयात खर्च निवडणूक निरीक्षक देवप्रकाश बमनावत यांनी केली.

उमेदवाराच्या प्रचाराच्या कालावधीत किमान तीन वेळा प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करण्यात येत असते. उमेदवारांना व्यक्तीशः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत नोंदवही सादर करणे आवश्यक आहे. ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०३- भोकरदन, १०२-बदनापूर व १०१-जालना विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात आली. विधानसभा निवडणुक प्रक्रियेमधील प्रत्येक तपासणीनंतर उमेदवाराच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीच्या तारखेपर्यंत स्कॅन करण्यात येऊन निवडणुक आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येत आहे. राज्य विधानसभेच्या प्रत्येक उमेदवारास ज्या तारखेस तो नामनिर्देशित झाला होता ती तारीख व निवडणुकीच्या निकाल घोषित झाल्याची तारीख या दोन्ही तारखांसह या दरम्यान त्याने केलेल्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा (हिशेब) ठेवणे अनिवार्य आहे. उक्त मर्यादेपेक्षा जास्त रक्कम खर्च करणे किंवा प्राधिकृत करणे हे लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२३ (६) च्या संदर्भात भ्रष्ट आचारण आहे. जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघातील प्रथम तपासणीच्या वेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी (खर्च) राजु सोळुंके यांच्यासह सहाय्यक खर्च निरीक्षक व लेखांकन चमुमधील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### छुप्या खर्चाची तपासणी कशी करणार?

बदनापूर येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात आ. नारायण कुचे यांची प्रचार यंत्रणा कार्यरत आहे. आ. कुचे यांनी अधिकृतपणे मध्यवर्ती प्रचार कार्यालय सुरु केले असले तरी, अनेक घडामोडी आणि कार्यकर्त्यांच्या जेवणावळी याच पक्ष कार्यालयात उठतांना सर्वांना दिसत आहे. या खर्चाचा समावेश उमेदवार आमदार नारायण कुचे हे आपल्या निवडणूक खर्चात दाखवितात की, पक्ष खर्चात दाखवतात याची शहानिशा निवडणुक विभागाने करावी.

### बबलू चौधरी खर्चात आघाडीवर


बदनापूर मतदार संघातील महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार बबलू चौधरी यांनी २४ ऑक्टोबर २४ ते ६ नोव्हेंबर २४ पर्यंतच्या १४ दिवसांचा खर्च हा ३ लाख ६८ हजार ७१८ रुपये इतका खर्च केल्याचे निवडणूक विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. यावरून आ. नारायण कुचे यांच्या तुलनेने बबलू चौधरी हे निवडणूक खर्चात आघाडीवर असल्याचे दिसते.

युवा आदर्श

### भुरळ ...

शब्दांचे सम्राट चांगले
पाडती सहज भुरळ
दावणीला बांधू जाई
सामान्य फसले सरळ
चमत्कारीक मृगजळ
असे टाकतात जाळं
हरेक शब्द वाटे खरे
गुंतून टाकते जंजाळ
फणा रे लोभसवाणा
नकळत ओतते गरळ
काट्याने वेढले जाते
नाजूक निर्मळ अरळ
बाताडे बोलती उधळ
हातात दिधला नारळ
कृतीत आणती उक्ती
शक्यता अति विरळ
फसतात भले चांगले
रे देखणेपणाला तरळ
कसे पोचावे सु स्थळ
रस्ता बनविला दूरळ
रे आयत्या पिठावरती
निवांत फिरती झुरळ
बदलला भला स्वभाव
वाकड्यात शिरे सरळ
मिथ्या पुढे सत्य उणे
जादुची पडली हुरळ
दिखाव्यांचे देखांव्या
खुणावी डोळा हरळ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.



संपादकीय पान

## पक्षीतज्ज्ञ

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा आज जन्मदिन आहे. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म आजच्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यंन्स आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २७ जुलै १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना जन्मदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## स्वातंत्र्याची आस म्हणजे काय?

किसानपुत्र आंदोलन ही संघटना नाही. येथे कोणी अध्यक्ष, सचिव किंवा कोषाध्यक्ष नाही. ज्या कोणाला शेतकरी स्वातंत्र्यासाठी झगडावे वाटते, ते सगळे किसानपुत्र आंदोलनाचे कार्यकर्ते, नेते आहेत. आई आजारी पडली तर तिला दवाखान्यात नेण्यासाठी कोणाच्या परवानगीची जशी गरज पडत नाही, तसेच किसानपुत्र आंदोलनाचे काम करण्यासाठी कोणाच्या परवानगीची गरज नाही.

'स्वातंत्र्याची आस' म्हणजे काय? स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव. जी बंधने आहेत, ती दूर करणे म्हणजे स्वातंत्र्याकडे वाटचाल करणे. शेतकऱ्यांवर कोणती बंधने आहेत? यादी करायला गेलो तर शेकडो नव्हे हजारो बंधने दिसतील. एक एक बंधन दूर करीत बसलो तर आपले आयुष्य पुरणार नाही. त्यासाठी थोडा विचार करून ठरवायचे की, अशी कोणती बंधने आहेत की, जी हटली तर बाकीची बंधने आपोआप हटतील. आम्ही असा विचार केला, तेंव्हा आमच्या लक्षात आले की, १) कमाल शेतजमीन धारणा कायदा (सीलिंग) २) आवश्यक वस्तू कायदा आणि ३) जमीन अधिग्रहण कायदा. हे तीन कायदे हटले की, परिस्थितीच बदलून जाते. म्हणजे हे कायदे असल्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती वाईट आहे. या कायद्यांनी ही व्यवस्था निर्माण केली आहे. हे तीन कायदे रद्द झाले तर बाकीची अनेक बंधने गळून पडतील, जी राहतील ती रद्द करून घेण्याची ताकत शेतकऱ्यांमध्ये आलेली असेल.

किसानपुत्र आंदोलनाचा मुद्दा विचारांचा आहे. त्यासाठी थोडा अभ्यास करावा लागेल. हे काम कठीण आहे. रूढ अर्थाने जशी आंदोलने होतात, तसे हे आंदोलन नाही. गर्दी जमवणे, घोषणा देणे, भाषण करणे, मोर्चा काढणे हे आंदोलनाचे तंत्र आता पुरे झाले! चळवळ म्हणजे विचार रुजवणे! त्यासाठी नव्या आयुद्धांची गरज आहे. आंदोलनाचे नवे तंत्र आपल्याला शोधावे लागेल.

नाविलाजाने का होईना, सरकारने १९९० साली खुलीकरणाचे धोरण स्वीकारले. खरे तर, त्याच वेळी शेतकऱ्यांवर बंधने लादणारे कायदे रद्द व्हायला पाहिजे होते, दुर्दैवाने तसे झाले नाही. नंतर सरकार बदलले. त्यानेही हे कायदे रद्द केले नाही. आज पर्यंत शेती क्षेत्रात खुलीकरण आलेच नाही. खुलीकरण जरी इंडियात (काही प्रमाणात) आले असले तरी त्याचा एक फायदा शेतकऱ्यांनी करून घेतला. आपली मुले/मुली त्यांनी शेतीच्या बाहेर काढली. या किसानपुत्राना माझे आव्हान आहे की, त्यांनी शेतकरीविरोधी कायदे समजावून घ्यावे व ते रद्द करून घेण्यासाठी प्रयत्न करावे! हे प्रयत्न म्हणजेच किसानपुत्र आंदोलन. हेच शेतकरी स्वातंत्र्याचे आंदोलन आहे!

**अमर हबीब, किसानपुत्र आंदोलन मो. ८४११९०९९०९**

# परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी पाचशे कोटींची तरतूद करून घेणार- दामले

### दीपावली स्नेहमिलनः ब्राह्मण सभेत दानशुर व्यक्तिंसह मान्यवरांचा सत्कार सोहळा

**जालना । प्रतिनिधी -** भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची घोषणा महायुतीच्या सरकारने केली आहे. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी पुढाकार घेतला. आज या मंडळाला प्राथमिक स्तरावर ५० कोटी रूपयांची तरतूद असली तरी भविष्यात यासाठी आपण पाचशे कोटी रूपयांची तरतूद करून घेऊन ब्राह्मण समाजातील गरजूंना अधिकाधिक लाभ कसा होईल या दृष्टीने नियोजन करणार असल्याचे प्रतिपादन भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे नूतन अध्यक्ष कॅप्टन आशीष दामले यांनी केले.

ते जालन्यातील ब्राह्मण सभा मंगल कार्यालयात आयोजित दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधिज्ञ सी.डी. देशपांडे, सचिन वाढे पाटील यांच्यासह ब्राह्मण सभेचे अध्यक्ष कल्याणराव देशपांडे, उपाध्यक्ष रमेश देहेडकर ,कार्याध्यक्ष डॉ.सुभाष भाले, कोषाध्यक्ष अशोकराव देशमुख यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना दामले म्हणाले की, ब्राह्मण समाजाला संघटित करण्यासाठी आपण आगामी काळात महाराष्ट्राचा दौरा करणार असून समाज एका धाग्यामध्ये बांधून समाजाची शक्ती काय हे दाखवून देऊ तसेच आपल्या समाजाबद्दल हेतुपरस्सर निंदानालस्ती आणि टीकाटिपणी केली जाते ती थांबविण्यासाठी काही ठोस असा कायदा करता येईल काय त्यावरही आपण विचार करत असून परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उभारण्याचे प्रयत्न राहणार असून पुरोहितांना दरमहा पाच हजार रूपयांचे मानधन सरकारकडून कसे घेता येईल यासाठी देखील प्रयत्न करणार आहोत. जालना हे ब्राह्मण समाजाचे चळवळीचे केंद्र आहे. येथेच ब्राह्मण समाजाचे पहिले अधिवेशन भरले होते. तसेच परशुराम आर्थिक विकास मंडळाची निर्मिती करण्यासाठी दीपक रणनवरे, सुरेश मुळे यांच्यासह समाजातील अन्य मान्यवरांनी जी चळवळ उभी केली होती ती आज यशोशिखरावर पोहचल्याचेही त्यांनी नमूद केले. याच कार्यक्रमात ज्येष्ठ विधिज्ञ सी.डी. देशपांडे, कल्याणराव देशपांडे, सुनील जोशी यांनी आपले विचार मांडले. समाजाने एकत्रित येण्याचे आवाहनही या तिघांनी केले. तसेच ही ब्राह्मण सभेची वास्तू उभी करण्यासाठी तब्बल दोन कोटी रूपयांचा खर्च आला असल्याचे सांगून यासाठी समाजातील श्रीमंत तसेच गोरगरिबांनी देखील आपल्या परिने मदत केल्यानेच हे शक्य झाल्याचे कल्याणराव देशपांडे यांनी आवर्जुन सांगितले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन आर.आर.जोशी यांनी केले. या सोहळ्यास ब्राह्मण समाजातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

**या मान्यवरांचा झाला सत्कार**

ब्राह्मण सभा उभारणीसाठी ज्या दानशूर व्यक्तींनी भरीव असे योगदान दिले अशांचा सत्कार आशीष दामले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यामध्ये सी.डी.देशपांडे, भारती विलास नाईक, श्रेया नाईक, डॉ.श्रीपाद देशपांडे, ज्येष्ठ विधिज्ञ बलवंत नाईक, डॉ.प्रकाश सिगेदार तसेच ब्राह्मण यौद्धा दीपक रणनवरे ,सुरेश मुळे, ड.श्रीकांत देशपांडे, शुभांगी देशपांडे, ज्येष्ठ विधिज्ञ सुरेश कुलकर्णी, विद्या कुलकर्णी,शिवाजी जोशी, राजकुमार दायमा, श्री फॅब्रीकेटर्सचे संचालक सुनील जोशी, संजय देशपांडे, प्रा.डॉ. ज्योती धर्माधिकारी, बांधकाम व्यावसायिक महेंद्र देशपांडे, पत्रकार दिलीप पोहनेरकर, संजय देशमुख,श्रीकांत शेलगावकर यासह एमबीबीएस मध्ये समाजातील चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे त्यांचाही सत्कार मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन हा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अमित मगरे, सुरेश मगरे, डॉ.चारुदत्त हवालदार, डॉ.जितेंद्र बारगजे, संजय क्षीरसागर, विनायक महाराज, दिलीप देशपांडे, भगवान पुराणिक, रविन्द्र देशपांडे,डॉ.संजय रुईखेडकर, रसना देहेडकर, विद्या कुळकर्णी, चारुस्मिता हवालदार, शोभाताई देशपांडे, सुचिता पालोदकर, जोस्ना भाले, सुलभा आगटे, सूनिला कांडलीकर, सुखदा देशपांडे,मनीषा कुळकर्णी, रेखा देहेडकर, रश्मी देहेडकर, संपदा कुळकर्णी आदी महिला व ब्रम्हवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# मुलाच्या प्रचारासाठी आई सुनंदा पवार मैदानात; गावभेट दौऱ्याला प्रतिसाद

**कर्जत जामखेड । प्रतिनिधी -** गेल्या पाच वर्ष निवडून आल्यापासून आमदार रोहित पवार यांच्या मातोश्री सुंनदाताई पवार ह्या कर्जत जामखेड मतदारसंघात काम करत आहेत. मतदारसंघात महिला बचत गटाचे मोठे जाळे विणले आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचं काम त्यांच्याकडून केले जात आहे. मग ते भिमथडी यात्रेत महिलांना स्टॉल उपलब्ध करून देण्यापासून तर त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देणे असो. आत्तापर्यंत कर्जत जामखेड मतदारसंघातील महिला बचत गटांना ३४ कोटी रुपये कर्ज मिळालं, त्यात सुनंदाताई पवार यांचा मोठा वाटा आहे. आजवर बँका या महिला बचत गटांना बिलकूल सहकार्य करत नव्हत्या. आमदार रोहित पवार आणि त्यांच्या मातोश्री सुनंदाताई पवार यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांची चर्चा करून त्यातून योग्य मार्ग काढल्यानंतर बँका बचत गटांना कर्ज देऊ लागल्या आणि आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच ३४ कोटी रुपये कर्ज मिळणे ही साधी गोष्ट नाही आणि विशेष म्हणजे या कर्जाची परतफेड करण्याचं प्रमाणही जवळपास ९९ टक्के आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असल्याने सर्वच पक्षाच्या प्रचाराने जोर पकडलाय. आमदार रोहित पवार यांचे जसे सर्व क्षेत्रात काम आहे तसंच सुनंदाताई पवार ह्याही महिला बचत गट, जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता, महिलांचं आरोग्य अशा विविध क्षेत्रात काम करत आहेत. सुनंदाताई पवार यांनी आता प्रचाराची धुराही खांद्यावर घेतली आहे आणि त्याही गावोगावी जाऊन नागरिकांच्या भेटी घेऊन आमदार रोहित पवार यांना निवडून देण्याचं आवाहन करत आहेत. यासोबतच आमदार रोहित पवार यांचे वडिल राजेंद्रदादा पवार, पत्नी सौ.कुंतीताई पवार आणि बहीण सईताई पवार हे सर्वजण सध्या कर्जत जामखेडमध्ये विविध गावांमध्ये जाऊन प्रचार करत आहेत. रोहित पवार यांनी गेल्या पाच वर्ष केलेली विकासकामे आणि कर्जत जामखेडचा बदललेला चेहरा मोहरा याची यानिमित्ताने उजळणी होत आहे.



# मतदान अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे

## पद्माकर गायकवाड : परतूरला निवडणुकीचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** मतदान अधिकाऱ्यांनी नेमून दिलेले काम अचूक व जबाबदारीने पार पाडावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी केले.

विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना सोमवारी दि. ११ रोजी शहरातील भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी नाट्यगृहात निवडणुकीचे दुसरे प्रशिक्षण देण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना गायकवाड बोलत होते.

गायकवाड पुढे म्हणाले की, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे कामकाज मतदान केंद्राध्यक्ष तसेच सर्व मतदान अधिकारी यांनी जबाबदारीने पार पाडावे.काम काज करताना वेळेचे कटाक्षाने पालन करावे.नियमानुसार कामे करावीत.प्रशिक्षणात सांगितलेल्या नियमानुसार सर्व कामे हाताळवीत.काही अडचण असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करावा असेही गायकवाड म्हणाले.

यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे, सोनाली जोंधळे यांनीही निवडणूक कामकाजा विषयी मार्गदर्शन केले.



निवडणूक कर्मचारी संतोष पवार,संजय कास्तोडे,जावेद पठाण,सोपान वडेकर यांनी मतदान यंत्र हाताळणे यासह इतर अनुषंगिक माहिती दिली.पोस्टल बॅलेटबद्दल यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी नायब तहसीलदार विनोद भालेराव,एस. यु. शिंदे,कुलदीप कुलकर्णी,कल्याण काळदाते, दिलीप कुलकर्णी, पठाण सर,लक्ष्मीकांत खळीकर,निवडणूक कर्मचारी रमेश आवटे,विजय बोरुळे,कृष्णा सोनवणे यांच्यासह निवडणूक कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ व दुपार अशा दोन सत्रात हे प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणाला २६ कर्मचारी अनुपस्थित असल्याची माहिती निवडणूक विभागातून देण्यात आली.

# संजय राऊत यांचा मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्सकडून निषेध

**जालना । प्रतिनिधी -** संजय राऊत यांनी व्यापारी वर्गाच्या विरोधात केलेल्या विधाना बद्दल संजय राऊत यांच मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स या वतीने तीव्र निषेध. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी काल व्यापारी वर्ग हा खोटं बोलतो व भेसळ करतो असे जे विधान केले आहे.

मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केलेला आहे. संजय राऊत यांनी केलेल्या विधानाबद्दल व्यापारी वर्गात ची माफी मागावी नसता संजय राऊत यांना त्यांची जागा व्यापारी वर्ग दाखवून देईल असे आपल्या पत्रकात म्हटले आहे. तसे पाहिले तर संजय राऊत हे भ्रष्टाचारात पैसे कमवण्याच्या आरोपाखाली जेलची वारी करून आलेले आहे असा माणूस जर व्यापारी वर्गावर असे खोटे -नाटे आरोप करून व्यापारी वर्गाला बदनाम करू इच्छित असेल तर त्याच्या विरोधात व्यापारी वर्ग तीव्र आंदोलन करतील. देशाची अर्थव्यवस्था ही व्यापारी वर्ग भरत असलेल्या करावरच चालू आहे.

एक दोन टक्के व्यापारी सोडले तर सर्व व्यापारी सचोटीने मेहनतीने व ग्राहकाच्या विश्वासाने व्यापार करून पैसे कमवत असतात. अशा व्यापारी वर्गावर त्यांनी केलेले विधान हे एक मानसिक आजाराने पछाडलेला माणूसच करू शकतो. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अध्यक्ष माननीय उद्धवजी ठाकरे यांनी त्यांना आपले विधान मागे घेण्यास लावून त्यांना व्यापारी वर्गाची माफी मागण्या सांगावे नसता व्यापारी वर्ग त्याच्या विरोधात व पक्षाच्या विरोधात नाराज होऊन त्यांच्या पक्षाला मतदान करणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी. असेही जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या पत्रकात व्यक्त करण्यात आले आहे. या पत्रकावर चेंबरचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा, महासचिव शाम लोया, कोषाध्यक्ष विकास सावजी प्रफुल मालानी, गजानन घुगे संजयजी दाढ, लक्ष्मीनारायण राठी, संदीप लाहोटी ,संजय मोदानी, , संतोष कावळे पाटील,, सुरेंद्र रेदासानी ,जफर मिर्झा इत्यादींनी संताप व्यक्त केला.

# टेंभुर्णी पोलीस स्टेशनची धडाकेबाज कारवाई, १७ गोवंशाची सुटका

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील टेंभुर्णी पोलीस स्टेशने धडाकेबाज कारवाई केली. टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांच्या नेतृत्वात, टेंभुर्णीच्या पोलीस स्टेशन कर्मचाऱ्यांनी टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या लालदेव फाट्याजवळ १७ गुण जातीची जनावर हे एका टेम्पोमध्ये कमी जागेत कोंबून व त्यांना त्रास देऊन, त्यांना त्रास होईल अशी दाबून,कृतीची वागणूक देन्यावरून, कोणताही चारापाणी न देता, याच्यावरून टेंभुर्णी पोलिसांच्या तपासणी पथकाने, या जनावरांची सुटका केली आहे. पुढील आरोपींच्या नावे कलीम उर्फ कलीमउद्दीन शेख युसुफ नशिराबाद जिल्हा जळगाव , इम्रान नावाबखान कुरेशी एरंडोल जिल्हा जळगाव, उर्हीपशू शब्बीरखा कुरेशी एरंडोल जिल्हा जळगाव, विरोधात गुन्हा दाखल केला आहे. एक लाख किमतीची चार बैल, दोन लाख ७५००० ची ११ पांढऱ्या रंगाची बैल, पन्नास हजार किमतीची दोन काळ्या रंगाची बैल, तसेच १४ लाख रुपये किमतीचे आयशर, असे एकूण १८ लाख २५ हजार रुपयांचे मुद्देमाल



जप्त केला. पोलीस हेडकॉन्स्टेबल राजू डोईफोडे यांनी हा गुन्हा दाखल केला असून, ठाणे अंमलदार देशपांडे यांनी गुन्हा दाखल करून घेतला, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांच्या नेतृत्वात ठाणे अंमलदार मानते हे पुढील तपास करीत आहे.

# मराठवाडा साहित्य परिषद निवडणुकीत ठाले-पाटील यांच्या पॅनलचे एकतर्फी वर्चस्व

## जालन्यातून डॉ. संजीवनी तळेगावकर, सुभाष कोळेकर निवडणूक जिंकले

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** मराठवाड्यातील साहित्य ,सांस्कृतिक क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय संचालक मंडळ निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष प्राचार्य डॉ. कौतिकराव ठाले पाटील यांच्या नेतृत्वाखालील संस्था वर्धक अराजकीय पॅनलने वर्चस्व निर्माण केले असून सर्व २२ उमेदवार विजयी झाले आहेत.

मराठी भाषा साहित्य आणि वांङ:मयाच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय संचालक मंडळ निवडीसाठी १० ऑक्टोबर ते ०८ नोव्हेंबर या कालावधीत पोस्टल पध्दतीने निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष प्राचार्य डॉ. कौतिकराव ठाले पाटील यांच्या नेतृत्वाखालील संस्थावर्धक अराजकीय पॅनलचे २२ आणि परिवर्तन पॅनल चे १५ उमेदवार उभे होते.

एकूण २५३० मतदारांनी मतदान केले. यात २५०४ मते वैध ठरली तर २६ मते अवैध ठरली.





शनिवारी ( ता. ०९) छत्रपती संभाजी नगर शहरातील अनंत भालेराव भवनात एकूण ०६ फेऱ्यांमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडली.

पहिल्या फेरीपासूनच ठाले पाटील यांच्या पॅनल चे सर्व उमेदवार आघाडीवर होते. ती आघाडी शेवटपर्यंत टिकून राहिली. सहाव्या फेरी अखेर मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निकाल जाहीर केला.

विजयी उमेदवारांना मिळालेली मते पुढील प्रमाणे ऋषीकेश कांबळे (२३७६), आसाराम लोमटे (२३७३), कौतिकराव ठाले पाटील (२३७०), देविदास फुलारी (२३६४), कुंडलिक अतकरे (२३६३), दीपा क्षीरसागर (२३५९), संजीवनी तडेगावकर (२३५७), दादा गोरे (२३४२), दगडू लोमटे (२३४२), संतोष तांबे (२३३८), सुभाष कोळकर (२३३५), रामचंद्र काळुंखे (२३३३), सरोज देशपांडे (२३३०), गणेश मोहिते(२३३०), किरण सगर (२३२०), नितीन तावडे (२३१८), जयद्रथ जाधव (२३१७), रामचंद्र तिरूखे (२३१५), हेमलता पाटील (२३१५), अनंत कराड (२३१२), संजीव कुलकर्णी (२३१०), नामदेव वाबळे (२२६९), यांनी विजय मिळवला. निकाल जाहीर होताच समर्थकांनी जल्लोष करत नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन केले.

### डॉ. संजीवनी तडेगावकर, सुभाष कोळकर यांचा समावेश!

म. सा. प. केंद्रीय संचालक मंडळ निवडणुकीत जालना जिल्ह्यातून आठ उमेदवार उभे होते. यात संस्थावर्धक अराजकीय पॅनलच्या विद्यमान संचालिका भाव कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर ( २३५७) आणि सुभाष कोळकर( २३३५) विजयी झाले. दरम्यान प्राचार्य डॉ कौतिकराव ठाले पाटील यांच्या नेतृत्वाखाली संस्था अराजकीय ठेवून मराठवाडा साहित्य परिषदेने मागील २० वर्षांत मराठी भाषा, वांङ्मय संर्वधनासाठी केलेली कामे, साहित्य संमेलनांसह राबवलेले उपक्रम, याची दखल घेत मराठवाड्याच्या सांस्कृतिक भवितव्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या निवडणुकीत मतदारांनी पुन्हा विश्वास दाखवला. अशा भावना डॉ संजीवनी तडेगावकर यांनी व्यक्त केल्या. तर साहित्य क्षेत्रातील अनुभवी तज्ञांसोबत आपल्याला काम करण्याची संधी दिल्याबद्दल सुभाष कोळकर यांनी मतदारांचे आभार मानले.

# झन्ना - मन्ना जुगार खेळणाऱ्या वर पारध पोलिसांची कारवाई



**सावंगी अवघडराव । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील पारध वलासावंगी गावाजवळ एका मोकळ्या फ्लाटवर बेकायदेशीर झन्ना-मन्ना जुगार खेळत असलेल्या चार जणांवर पारध पोलिसांनी कारवाई केली आहे.फिर्यादी कृष्णा मोतीराम गवळी वय ३० पोलीस ठाणे पारध यांनी दिलेल्या माहिती नुसार दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास वालसावांगी ते आरामाशिन रोडवरील एका मोकळ्या फ्लाटवर काही जण झन्ना-मन्ना जुगार खेळत होते पोलिसांनी गणेश रमेश गवळी (वय ३८ वर्ष)आसिफ शाह लतिफ शाह (वय २८ वर्ष) रवींद्र परभू सोनुने (वय २८ वर्ष)कृष्णा नारायण मुरडकर यांच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी घटनास्थळावरून मिळालेल्या मालात गणेश गवळी यांची टीवी एस स्टार सिटी काळ्या रंगाची मोटार सायकल (चक २० थ८५४९) पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.पारध पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या आदेशाने पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिनकर यांना देण्यात आले आहे.

# परतूरात तहसील कार्यालयाच्या मुख्य गेट समोर एक खिडकी कक्ष

**परतूर । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयाच्या मुख्यगेट समोर एक खिडकी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. प्रतिभा गोरे. सुंदरराव काळे नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली एक खिडकी कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे.या मध्ये विविध परवानगी समिती (शहर विभाग) वाहन परवाना प्रचार सभेसाठी लागणारा परवाना तसेच सभेसाठी लागणारी परवानगी इतर सुविधा उपलब्ध या एका खिडकी योजनेअंतर्गत सर्व कामे रिपोर्टिंग करणे. यामध्ये श्रीमती सी.पी. घुगे, सुरेश अरसूल, राहुल जाधव, अमोल लाहोटी, कविता धुमाळ, रामेश्वर बोराडे, व इतर कर्मचारी दिसत आहेत.



# संजय लव्हाडे यांना आदर्श व्यापारी पुरस्कार प्रदान

**जालना । प्रतिनिधी -** व्यापारी महासंघ जिल्हा जालना (कॅट) आणि जालना मर्चंट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १० नोव्हेंबर रोजी आयोजित दीपावली स्नेहमिलन व आदर्श व्यापारी पुरस्कार सोहळ्यात साखरेचे प्रसिद्ध व्यापारी संजय लव्हाडे यांचा मान्यवरांच्या हस्ते आदर्श व्यापारी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जैन भवनात पार पडलेल्या या कार्यक्रमात कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बालकृष्ण भरतीया, राज्य अध्यक्ष सचिन निवंगूने, राज्य उपाध्यक्ष सतीश पंच, जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब, सुखदेव बजाज, व्यापारी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. सीताबाई मोहिते आदी मान्यवरांच्याहस्ते संजय लव्हाडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी त्यांच्या समवेत स्वप्निल लव्हाडे, आरूष लव्हाडे उपस्थित होते.

संजय लव्हाडे यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. ते दिगंबर जैन समाजाचे विश्वस्त आहेत. १९८३ पासून ते साखरेचा व्यवसाय करतात. साखरकिंग अशी त्यांची ओळख आहे. सर्व समाजाशी त्यांचे मैत्रीपूर्ण आणि सलोख्याचे संबंध आहेत. व्यापार क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आदर्श व्यापारी पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

# मुद्रीत माध्यमाद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे पूर्व-प्रमाणिकरण करणे आवश्यक

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण करण्याचे निर्देश दिले आहेत. जालना जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ हे आहेत.

मुद्रीत माध्यमाद्वारे निवडणूक विषयक सर्व राजकीय जाहिरातींचे मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवसपुर्वी प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे पूर्व-प्रमाणिकरण करणे आवश्यक असल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे. जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात बुधवार, दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने दि. १९ आणि २० नोव्हेंबर, २०२४ रोजी उमेदवारांना वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती माध्यम पूर्व-प्रमाणन समितीकडून (चउचउ) पुर्व-प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे. पुर्व-प्रमाणीकरणासाठी समितीकडे २ दिवस आधी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. पुर्व-प्रमाणिकरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. उमेदवार व राजकीय पक्षांनी मुद्रीत माध्यमात मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवसपुर्वी प्रसिद्ध करावयाच्या आपल्या जाहिरातींचे पुर्व-प्रमाणिकरण करुन घेण्यासाठी आपले अर्ज दिलेल्या मुदतीत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडे वेळेत सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पांचाळ यांनी केले आहे.

# त्यांना फक्त आरोप करायचे आणि दुसऱ्याने केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचे काम - अर्जुनराव खोतकर!

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे लोकप्रिय अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यानी धावेडी, सोरटीनगरला भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, त्या आमदाराला फक्त दुसर्यांवर नको ते आरोप करायचे आणि दुसर्याने केलेल्या, आणलेल्या कामाचे श्रेय घ्यायचे एवढेच काम शिल्लक आहे. मतदारांनी आता खोट्या भुलथांपाना बळी न पडता, आपला कोण आणि परका कोण यातला फरक ओळखावा आणि येणार्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटण दाबून मला प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहनही श्री. खोतकर यांनी केले. याप्रसंगी शिवसेना युवासेना, शिवसैनिक, तसेच भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जेष्ठ मंडळी, महिला भगिनी, ग्रामस्थ, युवा पिढी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी अर्जुनराव खोतकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले. पुढे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, काही भामटे हे आम्ही आणलेल्या योजना चोरतात, आणि पुन्हा आपण योजना आणली म्हणून सांगतात. मेडीकल कॉलेस आपण आले मात्र तो भामटा सांगतो आम्ही आणले, महानगर पालिकेचा संपूर्णपणे बट्ट्याबोळ केला आहे. आपण सत्तेवर आलो तर संपूर्ण कामगार सुधाण्यात येईल. पाणी सुध्दा आपण आणले मात्र हा भामटा स्वत:ला जलसम्राट म्हणून घेत आहे. पदवी ही लोकांनी द्यायला हवी. स्वत:तर कोणीही जलसम्राट म्हणून मिरवेल, असे सांगून ते म्हणाले की, राज्यातले रस्ते, आरोग्य सेवा, परिवहन सेवा, पाणी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शेतकर्यांचे शेती विषयक योजना, वयोवृध्द मंडळींना वयोश्री योजना, महिला साठी दरमहा पंधरा रुपये या सर्व योजना महायुती सरकारने राबविल्या आहेत. त्यामुळे देते देशातील पहिले सरकार ठरले आहे. आपले कोणतेही काम असू द्यात ते मार्गी लावण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला जाईल, असे आश्वासनही श्री. खोतकर यांनी दिले.

# अर्जुनाला चक्रव्यूह भेदण्याचे ज्ञान आहे; विकास विरोधी दुर्योधनाला त्याची जागा दाखवा - शिंदे



## पीआरकार्ड, महात्मा फुले मार्केट, पाणी, सोलार प्रकल्प, नाट्यगृह जालन्यातील मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी एक हजार कोटींची तरतुद करण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांचे आश्वासन

### जालना शहरातील आझाद मैदानावर रेकॉर्डब्रेक सभा; वातावरण भगवेमय



**जालना । प्रतिनिधी** - महायुतीचे सरकार हे देना बँक आहे, हे देणारे सरकार आहे, अर्जुनरावांनी सांगितल्याप्रमाणे जालन्यातील पीआरकार्डचा प्रश्न, महात्मा फुले मार्केटचा प्रश्न, पाणी प्रश्न, नाट्यगृह आदी सर्वच मुलभत प्रश्नासाठी सोडविण्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिली असून जालन्याचा अनुशेष भरुन काढण्यासाठी दहा-वीस-पन्नास कोटी नव्हे तर एक हजार कोटींची आवश्यकता असेल आणि आचारसंहिता संपल्यानंतर सरकार आल्यास त्याची तरतूद आपण करू असे आश्वासनही श्री. शिंदे यांनी उपस्थितांना दिले.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी अर्जुन खोतकर यांना निवडुन द्या असे आवाहन उपस्थितांना केले. त्यावेळी उपस्थितांनी 'आम्ही आमदार देतो आम्हाला मंत्री द्या' अशी घोषणा केली. यावर एकनाथ शिंदे यांनी तुम्ही रेकॉर्डब्रेक मतांनी निवडून दिल्यास तुमची इच्छा पुर्ण करे असे आश्वासन उपस्थितांना दिले.

जालना विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवसेना शिंदे गटाचे अर्जुनराव खोतकर यांच्या प्रचारार्थ शहरातील आझाद मैदानावर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रनाथ पठाडे, उपाध्यक्ष भास्करराव दानवे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंद चव्हाण, ज्येष्ठ उद्योजक घनश्यामदास गोयल, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, कृष्णगोपाल तिवारी, फेराजलाला तांबोळी, अण्णासाहेब चितेकर, संध्याताई देठे, शंकुतला कदम, कालिंदाताई ढगे, कमलताई तुल्ले आदींची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने अनेक लोककल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. त्यामुळे सर्व सामान्य जनतेचे जीवनमान उंचावले आहे. विरोधक केवळ लहान मुलांसारखे रडतात त्याने हे चोरलं ते चोरलं, आरोप-प्रत्यारोप करतात, शिव्याशाप देतात. लोकशाहीत ज्याच्याकडे बहुमत आहे पक्ष त्याचा असतो, निवडणुक आयोग असो, न्याय पालिका असो, या संस्थांनी त्यांच्या बाजुने निकाल दिला तर ते चांगले अन्यथा त्यांच्या विरोधात निकाल गेल्यास लगेच त्या यंत्रणा बोगस ठरविल्या जातात. अडीच वर्षे महाविकास आघाडीच्या सरकारने कामे केले. घरात बसुन फेसबुक लाईव्ह करुन कामे होत नसतात. विद्यार्थी, व्यापारी ओरडत होती. आम्हाला काही पॅकेज द्या मात्र, यांनी घराची खिडकी सुद्धा उघडून बाहेर पाहिले नाही. बाळासाहेब ठाकरेंनी सांगितलेले आहे शिवसेनेचा कार्यकर्ता हा स्वतः च्या घरात नाहीत तर लोकांच्या दारात शोभतो, आम्ही बाळासाहेबांचे, आनंद दिघेंचे कट्टर शिवसैनिक आहोत, अर्जुनरावही पहिल्यापासून आमच्या सोबत आहेत.

सीएम म्हणजे कॉमन मॅन, मी कॉमन आहे, सामान्य कार्यकर्ता आहे, कालही कार्यकर्ताच होतो भविष्यातही कार्यकर्ताच राहणार असल्याचे सांगत महायुतीच्या सरकारने दहा कलमी योजना आणली आहे. लाडक्या बहिणीचे १५०० रुपयांवरून २१०० आम्ही करणार आहोत, शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी, जीवनाश्यक वस्तुंचे भाव स्थिर ठेवणार, २५ लाख तरुणांना रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांसाठी ७.५एचपी पर्यंत मोफत वीज त्यापुढील वीजेसाठी ३० टक्के सवलत देणार आहोत आम्ही सर्व सामान्यांसाठी विविध योजना राबविल्या आहेत. लाडकी बहिण योजना, लाडका भाऊ योजना, वृद्धांसाठी तीर्थदर्शन योजना आदी योजनांचा उल्लेख करत आजपर्यंतच्या इतिहासात असे निर्णय झालेले नाही. या महाविका आघाडीच्या सरकारने महिलांचा अवमान केला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर महिलांना १५०० रुपयांची लाच देताहेत असे हिणवल्या गेले. महिलांच्या खात्यात दोन हफ्त्याची रक्कम जमा झाल्यानंतर त्यांनी पळापळ सुरु केली. म्हणे आम्ही ३ हजार रुपये देऊ आधी का नाही दिले. आता या योजनांची चौकशी लावण्याची धमकी विरोधक देत आहेत. माझ्या लाडक्या बहिनींसाठी, भावासाठी, शेतकऱ्यांसाठी, कष्टकऱ्यांसाठी, एकदा नव्हे तर शंभरदा तुरुंगात जाण्याची तयारी असून अशा लोकांना जनताच धडा शिकविणार असल्याचेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री मी आणि योजना याने आणली हे कसे शक्य आहे, काही तरी पटेल असे बोला असे म्हणत आ. कैलास गोरंट्याल यांच्यावरही शिंदे यांनी निशाणा साधला, शासकीय वैद्यकिय महाविद्यालयासाठी अर्जुन खोतकर यांनी पाठपुरावा केला, महायुती सरकारने ते मंजुर करुन घेतले. कामे आम्ही करायची आणि श्रेय यांनी घ्यायचे हे चालणार नाही. जालना ही मराठवाड्याची शान आहे आणि अर्जुनाच्या हाती धनुष्यबाण आहे असे सांगतांनाच अर्जुनाला चक्रव्यूह भेदण्याचे ज्ञान असून आपण अर्जुनाचा अभिमन्यू होऊ देणार नाही, त्यांच्या कृष्ण रुपाने आपण आहोत, केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे देखील कृष्ण रुपात त्यांच्या सोबत असल्याचे सांगून श्री शिंदे यांनी खोतकर यांना विधानसभेपर्यंत घेऊन जाण्याची जवाबदारी रावसाहेब दानवे यांच्यावर टाकली. महायुतीतील सर्वच घटक पक्षांनी विचार करावा आपल्या हक्काचा माणूस विधानसभेत असल्यास आपण हक्काने काम करुन घेऊ शकतो, अर्जुन खोतकर यांनी ऐकले नाही तर मी आहे, असे म्हणत अर्जुन खोतकर यांना निवडून देण्यासाठी धनुष्यबाण या चिन्हाचे बटन दाबण्याचे आवाहन त्यांनी केले. यावर उपस्थित जनमुदायाने आम्ही आमदार देतो आम्हाला मंत्री द्या म्हणून मुख्यमंत्र्यांना साद घातली. यावर शिंदे यांनी तुम्ही रेकॉर्डब्रेक मतांनी खोतकर यांना निवडून द्या आपली इच्छा पूर्ण होईल असे आश्वासन देत सभेला जय महाराष्ट्र केला.

यावेळी भाजपाचे प्रदेश नंमत्रित सदस्य राजेश राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांचीही भाषणे झाली. सभेचे सूत्रसंचालन शुभम टेकाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शहरप्रमुख विष्णू पाचपुले यांनी केले.

## कमलताई तुल्ले यांचा शिवसेनेत प्रवेश



भारतीय जनता पक्षाच्या नेत्या माजी नगरसेविका कमलताई तुल्ले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थिती शिवसेनेत प्रवेश केला. गेल्या काही वर्षांपासून भारतीय पार्टीतील जिल्हा व शहर कार्यकारिणीत अनेक नविन चेहऱ्यांना संधी दिली गेली मात्र, महत्त्वाच्या पदांपासून त्यांना वंचित ठेवल्या गेल्याची भावना त्यांच्या समर्थकांमध्ये निर्माण झाली होती. राज्यात व देशात भाजपा सत्तेत येण्यापुर्वी कमलताई तुल्ले यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी पक्षाचा एकहाती किल्ला लढविलेला आहे. विशेष म्हणजे त्या जालना जिल्ह्यातील एकमेव महिला कारसेविका होत्या. पक्ष अडचणीत असतांना त्यांनी कार्यकर्त्यांना धीर देण्याचे काम केले. मात्र, पक्ष सत्तेत आल्यानंतर विस्तारीकरणाच्या धोरणात अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी मिळू शकलेली नाही. पर्यायाने त्यांच्यासह जुने जाणत्या कार्यकर्त्यांमध्ये अन्यायाची भावना वाढीस लागली त्यातूनच पक्ष बदलाची भुमिका काही जण घेत आहेत. कमलताई तुल्ले यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने जुना जालना भागात शिवसेनेची शक्ती वाढण्यास मदत होईल, असे राजकीय जाणकारांना.वाढते.



## कृष्णरुपी दानवे, चव्हाण पाठीशी, पराभव शक्य नाही -खोतकर

जालना विधानसभा मतदार संघातून आपण महायुतीच्या वतीने लढत असून, मुख्यमंत्री एकनाथ् शिंदे, भाजपाचे रावसाहेब दानवे, अरविंदराव चव्हाण हे कृष्णरुपी आपल्या पाठीशी असून, त्यांच्यामुळे आपला पराभव शक्यच नसल्याचा विश्वास महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला. कुठल्याही पदावर नसताना केवळ मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठबळामुळेच आपण जालना मतदार संघातील विविध विकासकामांसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी आणू शकलो. जालन्याच्या आमदाराने स्टील उद्योग बदनाम करण्याचा प्रयत्न केला. तसेच अनेक योजना आपण आण्ल्या असतानाच त्यांचे केवळ श्रेय घेण्याचा केवीलवाणा प्रयत्न केल्याचा आरोप खोतकर यांनी विरोधकांवर केला. तसेच महात्मा फुले मार्केट, दररोज पाणी पुरवठा, पीआरकार्ड, सोलार प्रकल्प, नाट्यगृहाचे प्रश्न सोडविण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

## उद्धव ठाकरेंनी अनैसर्गिक आघाडी केली

असंगाशी संगत करुन उद्धव ठाकरे यांनी काँग्रेससोबत आघाडी करुन अनैसर्गिक सरकार बनवले. कोरोना काळात माझं कुटुंब माझी जबाबदारी हेच सूत्र त्यांनी अवलंबविले. त्यांच्या कार्यकाळात एकही लोककल्याणकारी योजना आणली नाही. शिंदे सरकारने असंख्य लोकहिताच्या योजना आणल्या. दोन्ही सरकारच्या कार्याची तुलना करत होऊ द्या दूध का दूध आणि पाणी का पाणी, असे म्हणत शिंदे सरकारने केलेल्या कामामुळे राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येईल, असा विश्वास भाजपाचे नेते रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला. महायुतीच्या सरकारने राबविलेल्या योजनांचीही माहितीही दानवे यांनी यावेळी दिली. त्याच बरोबरच २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने युती सरकारला म्हणजे भाजपा शिवसेनेला जनमत दिले. मात्र, निकालाच्या दिवशी जसं जसे निकाला घोषित व्हायला लागले तसे दुपारीचं उद्धव ठाकरे यांनी आमच्याकडे सर्व पर्याय खुले असल्याचे सांगितले. नंतर त्यांनी काँग्रेससोबत आघाडी करत अनैसर्गिक सरकार स्थापन केले. मात्र, या सरकारने एकही काम केले नाही. त्यांनी किमान चार कामे सांगावित असे आव्हान त्यांनी उद्धव ठाकरेंना दिले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.